विभागीय शिक्षण उपसंचालक ,पुणे विभाग,पुणे
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.
दुरध्वनी क्र.०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ फॅक्स नं.०२०-२६१२२२१७
ई मेल आय डी क्र. Dydpune @ gmail.com वेब साईट- www.dydepune.com

जा.क्र. शिउसं/उमाशी-१/बायोमॅटीक/२०१५/९४२०२८ दिनांक – २४/०७/२०१५

प्रति,

सर्व प्राचार्य,
कनिष्ठ महाविदयालये (सर्व),
पुणे/पिंपरी-चिंचवड शहर/सोलापुर शहर/अहमदनगर शहर.

विषय : कनिष्ठ महाविदयालयात विदयार्थ्यांकरीता बायोमेट्रिक यंत्रणा बसविणेबाबत.

संदर्भ : शासन निर्णय दि.२ मे २०१२

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, वरील संदर्भीय विषयानुसार या कार्यालयाच्या असे निदर्शनास आणून दिले गेले आहे की, शहरातील प्रमुख कनिष्ठ महाविदयालयांमध्ये विदयार्थी वर्गात बसत नाहीत व अध्यापनाचे कामकाज शासन नियमानुसार होत नसल्याचे दिसून येते.

त्याचप्रमाणे काही कनिष्ठ विदयालयांमध्ये प्राध्यापकांऐवजी काही खाजगी क्लासेसचे शिक्षक वर्गात येऊन अध्यापन करतात ही बाब अत्यंत गंभीर आहे. म्हणून या कार्यालयाने असा निर्णय घेतला आहे की, चालू शैक्षणिक वर्षापासुन (२०१५-२०१६) संपूर्ण पुणे विभागात टप्प्याटप्प्याने विदयार्थ्यांची बायोमेट्रिक हजेरी नोंदविण्यात यावी.

यापैकी १ल्या टप्प्यात पुणे पिंपरी-चिंचवड मनपा हद्दीतील कनिष्ठ महाविदयालयांमध्ये, सोलापुर आणि अहमदनगर शहरातील मनपा हद्दीतील कनिष्ठ महाविदयालयामध्ये बायोमेट्रिक हजेरी यंत्रणा बसविण्याचा निर्णय या कार्यालयामार्फत घेण्यात आलेला आहे.

तरी सर्व प्राचार्यांनी याबाबतची कार्यवाही तात्काळ करावी. सदर यंत्रणेची खरेदी ही नियमाप्रमाणे करण्यात यावी. सदरचा खर्च हा तूर्तास महाविदयालयांनी स्वत:च्या फंडातून

(निधीतून) करावा आणि ज्यावेळी वेतनेत्तर अनुदान दिले जाईल त्यावेळी त्यात खर्ची टाकावा. विनाअनुदानीत कनिष्ठ महाविदयालयाने देखील त्यांचे फंडातून खर्च करावा. सदर यंत्रणा खरेदीसाठी कोणतीही एजन्सी या कार्यालयाकडून निश्चित करण्यात आली नाही याची कृपया नोंद घ्यावी.

सर्व कनिष्ठ महाविदयालयात बायोमेट्रिक यंत्रणा बसवून तात्काळ सर्व विदयार्थ्यांची बायोमेट्रिक हजेरी नोंदवावी. व तसा अहवाल या कार्यालयास दि. ०१/०९/२०१५ पर्यंत सादर करावा.

(रामचंद्र जाधव)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१